# महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत
# रस्ते विकास प्रकल्प

१. प्रकल्पाची एकुण किंमत - १०८.११ कोटी

२. प्रकल्पाचा उद्देश

कोल्हापूर शहर हे पश्चिम महाराष्ट्रातील एक ऐतीहासीक वारसा लाभलेले सांस्कृतीक शहर आहे. तसेच या शहरा मध्ये करवीर निवासीनी श्री. महालक्ष्मी मंदीर असुन शहरामध्ये व शहरालगत बरेच ऐतिहासीक ठिकाणे आहेत. उदा. पन्हाळा व जोतिबा, नरसोबावाडी इत्यादी या मुळे शहरात येणा-या भाविकांची व पर्यटकांची संख्या खुप मोठी आहे. शहरातील रस्त्यांची अतिशय खराब अवस्था आहे. ती सुधारणे आवश्यक आहे. त्यासाठी शहरातील व उप-नगरातील महत्वाचे एकुण ३९ रस्ते अंदाजे ५०.७५ कि.मी. लांबीचे प्रस्तावीत आहे.

३. कामातील ठळक बाबी.

- एकुण ३९ रस्ते लांबी ५०.७५ कि.मी. मजबुतीकरण व डांबरीकरण करणेत येणार आहे.
- या रस्त्यांचे दोन्ही बाजूस पावसाळी पाणी वाहुन नेण्यासाठी गटर प्रस्तावीत आहेत
- केबल खुदाई मुळे रस्ते खराब होऊ नयेत या साठी दोन्ही बाजूस रस्त्याला समांतर डक्ट व ठरावीक अंतरावर क्रॉस डक्ट प्रस्तावीत आहेत.
- आवश्यकत्या ठिकाणी पादचा-यासाठी फुटपाथ प्रस्तावीत आहेत.

४. प्रकल्पाचे फायदे :-

- शहरातील नागरीकांसाठी व पर्यटकांसाठी चांगल्या दर्जाचे रस्ते उपलब्द होणार आहेत.
- वहातुकीवरील ताण कमी होऊन ती सुरळीत होणार आहे.
- चांगल्या रस्त्यांमुळे शहरातील प्रवासाचा वेळ वाचणार असुन वहानांचे इंधन बचत व दुरुस्तीवरील खर्च कमी होणार आहे.
- नागरीकांना दिलेल्या चांगल्या रस्त्यामुळे पर्यटकांची संख्या वाढणार असुन शहराच्या उत्पनात वाढ होणार आहे.
- शहराच्या सौदर्यात भर पडणार आहे.

५. प्रकल्पाची सध्यस्थिती :-

- सदरचे प्रस्तावास मा. मुख्य अभियंता, सा.बां.प्रदेशिक विभाग पुणे -१ यांनी जा.क्र.का-२/रस्ते/कोल्हापूर /३१४४/२०१० दिनांक २२/०६/२०१० अन्वये रू. १०८.११ कोटीचे एकुण ३९ रस्तेचे प्रकल्पास तांत्रीक मान्यता दिलेली आहे.
- शासन निर्णयानुसार गठित केलेल्या - प्रकल्प मान्यता व संनियत्रण समिती च्या दिनांक १७/०८/२०१० चे मा.सचिव (नवि) यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली आहे. व प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी व निधी वितरनासाठी शासनकडे शिफारस केलेली आहे.
- महानगरपालिके मार्फत वरील कामीची निविदा दिनांक २९/०७/२०१० रोजी प्रसिध्द केली होती त्यास चांगला प्रतिसाद प्राप्त झालेला आहे. निविदा दर १० ते १२ टक्के कमीने आलेले आहेत. सदरच्या कामांचे करार ठेकेदार यांचे सोबत करणेची कार्यवाही सुरु आहे.
- शासन निर्णय क्र.नगरो – २०१० /प्र.क्र.२४२/ नवी-३३ दि.२३ फेब्रुवारी २०११ अन्वये शासनाच्या अनुदानाच्या हिश्यामधील १३.५१३७ कोटी इतकी रक्कम वितरीत झालेली आहे.

## टेंडर नोटीस क्रमांक ४५ दि.३०/७/२०१० रोजी प्रसिध्द केलेल्या कामांची ३९ रस्तेची यादी पुढील प्रमाणे.

| अ.नं | कामाचे नांव | आयएलआर नं. | समाविष्ठ रस्त्यांची नांवे |
|---|---|---|---|
| १ | Widening and Improvement of Internal Link Roads – ILR no 13, 16, 19, 21, 24, 31,45, A, E, K. | १३ | यल्लमा चौक ते कंदलगाव जकात नाका (आर.के.नगर) |
| | | १६ | इरानी क्रशर खाण ते अंबाई टॅंक ते दत्तमगल कार्यालय |
| | | १९ | टिंबर मार्केट कमान (पाण्याचा खजीना) ते फायर स्टेशन राजाराम चौक ते राज कपुर पुतळा |
| | | २१ | एनसीसी ऑफिस ते कॉमर्स कॉलेज हॉस्टेल ते महादेव मंदीर (अराऊंड पद्माळे ग्राऊंड) |
| | | २४ | जमदग्नी ऋषी देवालय ते नेहरु नगर |

| अ.नं | कामाचे नांव | आयएलआर नं. | समाविष्ठ रस्त्यांची नांवे |
|---|---|---|---|
| | | ३१ | आयटीआय ते नाळे कॉलनी गार्डन ते वसंत विश्वास पार्क देवकर पाणंद |
| | | ४५ | शास्त्री नगर ते रेडयाची टक्कर. |
| | | A | आयसोलेशन हॉस्पीटल कमान ते नेहरु नगर ते विश्वकर्मा सोसा. ते जवाहर नगर ते गवत मंडई ते शाहूपूरी ते गोकूळ हॉटेल. |
| | | E | हॉकी स्टेडीयम चौक ते रामानंदनगर ते पाचगांव |
| | | K | पीटर चौधरी-जगताप नगर-पाचगांव पूल-जरगनगर कमान |
| २ | Widening and Improvement of Internal Link Roads – ILR no 35, 37, 38, 40, 44, D,F,J,L,M. | ३५ | एसएससी बोर्ड चौक ते राजेंद्र नगर ते मोरेवाडी जकात नाका |
| | | ३७ | नार्वेकर मार्केट ते रेडयाची टक्कर ते प्रतिभा नगर ते विश्वकर्मा अपार्ट. ते सुभाष नगर चौक |
| | | ३८ | शाहुपूरी ५ वी गल्ली व्यापार पेठ रोड |
| | | ४० | राजारामपुरी मेन रोड जनता बाझार ते मारुती मंदीर आणि कॅसेल हॉटेल ते शाळा नं.९ आणि ताराराणी हायस्कूल ते माऊली पुतळा. |
| | | ४४ | एनसीसी भवन ते मालती अपार्टमेंट ते वी.स.खांडेकर स्कूल कॉर्नर. |
| | | D | सिध्दार्थ नगर मेन रोड ते स्मशान भूमी. |
| | | F | रंकाळा स्टँड ते दुधाळी ते शिंगणापूर नाक |
| | | J | शिंगणापूर नाका किडकडी मित्र मंडळ-जिव्हाळा तरुण-शामस्मृती-गुरुगंध-शिवतेज-जयशंकर-नलिनी बझार |
| | | L | राजीव गांधी पुतळा ते एस.टी.स्टँन्ड ते परिख पूल व एस.टी.स्टँन्ड ते दाभोळकर कॉर्नर |
| | | M | व्हिनस चौक ते कोंडा ओळ ते महाराणा प्रताप चौक व महापालिका ते महाराणा प्रताप चौक ते फोर्ड कॉर्नर ते व्हिनस चौक. |
| ३ | Widening and Improvement of Internal Link Roads – ILR no 14, 17, 18, 20, 23, 25, I and Strom Water Drain for other than ILR roads. | १४ | फुलेवाडी नाका ते राधानगरी रोड (नवीन वाशीनाका) ते साई मंदिर |
| | | १७ | ए / लक्षतीर्थ वसाहत बसरुट |
| | | १८ | ए/ फुलेवाडी बसरुट |
| | | २० | तुळजा भवानी सोसा. ते साळोखे नगर बस रुट |
| | | २३ | राधानगरी रोड ते राजोपाध्ये नगर ते डायना पार्क |
| | | २५ | कळंबा रोड ते बापूराम नगर बसरुट |
| | | I | कणेरकर नगर मेनरोड, बी डी कामगार चाळ ते कणेरकर नगर ते रिंग रोड ते क्रांतिसिंह नाना पाटील नगर. |
| ४ | Widening and Improvement of Internal Link Roads – ILR no 46, 47, 50, 51, 53, 55, 57, 58, 60, C, G, H. | ४६ | सेनापती बापट रोड ते युनिर्व्हसिटी रोड. |
| | | ४७ | मार्केट यार्ड ते जाधववाडी ते कदमवाडी ते भोसलेवाडी चौक. |
| | | ५० | शिरोली नाका रोड मार्केट यार्ड कंपौंड ते जगदीश ऑईल मिल ते लोणार वसाहत रोड. |
| | | ५१ | वायचळ पथ रुईकर कॉलनी ते राजगौरव मंगल कार्यालयते लिशा हॉटेल ते शाहू कॉलेज रोड. |
| | | ५३ | शेतकरी पेट्रोल पंप (टेंबलाई रेल्वे गेट) ते लोणार वसाहत. |
| | | ५५ | सेंट्रल बिल्डींग (बावडा रोड) ते लाईन बझार त भगवा चौक. |
| | | ५७ | राम सोसायटी ते डी.वाय.पाटील बंगलो ते पंचरत्न कॉलनी ते राजर्षी शाहू हायस्कूल ते फायर स्टेशन. |
| | | ५८ | श्री रेणूका मंदिर ते राजर्षी शाहू जन्म ठिकाण ते कागलवाडी. |
| | | ६० | महावीर चौक ते न्यु पॅलेस ते नाईक मळा. |
| | | C | वायचळ पथ ते रुईकर कॉलनी टॉवर ते महाडीक माळ ते दत्ता मंदिर |
| | | G | महाडीक वसाहत (दत्त मंदिर रोड) |
| | | H | दानत हॉटेल मेन रोड |

# महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान
# स्ट्रॉम वॉटर मॅनेजमेंट प्रकल्प

१. प्रकल्पाची एकुण किंमत :- ७५.५८ कोटी

२. प्रकल्पाचा उद्देश

संपुर्ण शहराचा अभ्यास करुन, शहरातील पावसाचे पाणी योग्य रितीने निचरा होण्यासाठी टप्प्या टप्प्याने कामे करणेचे असुन पाण्याच्या प्रवाहानूसार शहराची पाच पाणलोट क्षेत्रात विभागनी केलेली आहे. पावसाळयात ज्याठिकाणी वारंवार पाणी साठल्यामुळे नागरीकांची गैरसोय होते व पावसाळयामध्ये नाल्याचे पाणी शहरात ज्या भागात परसते अशा ठिकाणांची निवड करुन त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेत आलेला आहे. तसेच काही रस्त्यांना पावसाळी पाणी वाहुन नेण्याची व्यवस्था नसलेने रस्ते खराब होतात त्या रस्त्यांच्या बाजूची पावसाळी गटर प्रस्तावीत केलेली आहेत.

३. कामातील ठळक बाबी

अ) नाला चॅनललायजेशन करणे

| | |
|---|---|
| जयंती नाला | १.३८६ कि.मी. |
| जयंती नाला शाखा | ५.२१५ कि.मी. |
| गोमती नाला | ३.२२३ कि.मी. |
| गोमती नाला शाखा | १.८४९ कि.मी. |
| झेड पी नाला | ०.७०४ कि.मी. |
| देवकरपानंद नाला | १.१९१ कि.मी. |
| एकुण | १३.५६८ कि.मी. |

ब) प्रस्तावीत कलव्हर्ट - एकुण ४१

क) रस्त्यालगतचे ड्रेंन - ९३.८५४ कि.मी.
(पैकी पाईप ड्रेन - ४९.२२२ कि.मी., आर.सी.सी.ड्रेंन - ४४.६३२ कि.मी.)

४. प्रकल्पाचे फायदे -

१. डिजाईनप्रमाने साईजचे नाले बांधल्यामुळे पुराचा धोका टळेल व स्थावर मालमत्तेचे नुकसान होणार नाही
२. नाल्यांमध्ये गाळ साठणार नाही व पाणी साठुन राहाणार नाही, त्यामुळे नाले स्वच्छ राहुन नागरिकांचे आरोग्य व रहाणीमान सुधारेल.
३. रस्ते देखभाल दुरुस्तीवर होणारा खर्च कमी होईल.
४. पावसाळयात वहातुकीस अडथळा होणार नाही.
५. नाले अतिक्रमणास आळा बसेल
६. नैसर्गिक नाल्यांचे जतन होईल
७. रस्त्यावर तसेच सखल भागात पाणी साठणार नाही व नागरिकांची गैरसोय होणार नाही.

५. प्रकल्पाची सध्यस्थिती :-

- सदरचे प्रस्तावास मा. मुख्य अभियंता, सा.बां.प्रदेशिक विभाग पुणे -१ यांनी जा.क्र.का-२/रस्ते/कोल्हापूर /३९४३/२०१० दिनांक २२/०६/२०१० अन्वये रु. ७५.५८ कोटीचे प्रकल्पास तांत्रीक मान्यता दिलेली आहे.
- शासन निर्णयानुसार गठित केलेल्या - प्रकल्प मान्यता व संनियत्रण समिती च्या दिनांक १७/०८/२०१० चे मा.सचिव (नवि) यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली आहे. व प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी व निधी वितरनासाठी शासनकडे शिफारस केलेली आहे.
- महानगरपालिके मार्फत वरील कामीची निविदा दिनांक २९/०७/२०१० रोजी प्रसिध्द केली होती त्यास चांगला प्रतिसाद प्राप्त झालेला आहे. निविदा दर १६ टक्के कमीने आलेले आहे.
- सदर प्रकल्पास शासनाची अद्याप अंतिम मंजुरी मिळालेली नाही.